ePaper

## तक्रार घेऊन गेलेल्या एकनाथ शिंदेंना अमित शाहांनी उलटं सुनावलं?

| वर्ष - 9 | अंक -88 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- मुशफिकुर रहीमचा वर्ल्ड रेकॉर्ड!
- वर्ल्ड कप सत्य साई बाबांमुळे जिंकू शकलो
- काँग्रेस नेत्याने शशी थरूरांना सुनावले
- बुद्धिजीवी लोक दहशतवादी बनतात


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 21 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भाजपने टाकलं राजकीय जाळं — दहा बडे नेते ‘घड्याळ’ सोडण्याच्या तयारीत

# भाईबाबत सबुरी, आता दादांची बारी!

## भाजपचा मोठा डाव: पिंपरी-चिंचवडमध्ये ‘ऑपरेशन पीसीएमसी’ सुरू

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजल्यानंतर महायुतीमध्ये सत्तासंघर्षाचा ताण वाढलेला स्पष्ट दिसत आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या तिन्ही सत्ताधारी पक्षांमध्ये आंतरिक घुसखोरी, आमिषे आणि सत्ता समीकरणांचा नवा खेळ सुरू झाल्याचं चित्र उभं राहिलं आहे.**



एकनाथ शिंदेंच्या नाराजीने सुरू झालेला महायुतीतील अंतर्गत युद्ध आता अजित पवारांच्या गडावर पोहोचले आहे. भाजपाने पिंपरी-चिंचवडमध्ये टाकलेलं राजकीय जाळं किती फलदायी ठरेल? राष्ट्रवादीतील हे १० नेते खरोखरच ‘घड्याळ’ खाली ठेवणार का? याच घडामोडींमध्ये आता जोरदार राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजकीय गडावर—पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाने ‘ऑपरेशन पीसीएमसी’ राबवण्यास सुरुवात केली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात चांगलीच तापली आहे.

**शिंदेंच्या नाराजीनंतर दुसरं लक्ष्य – अजित पवार**

महायुतीत सुरू असलेल्या ‘फोडाफोडी’मुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन नाराजी व्यक्त केली होती. त्याची धग अजून ओसरत नाही, तोपर्यंत आता दुसऱ्या मोठ्या नेत्या—अजित पवारांच्या संघटनात्मक पाया हलवण्याचे संकेत दिसू लागले आहेत.

भाजपने पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या तब्बल १० माजी नगरसेवकांसोबत संपर्क साधल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. काहींची चर्चा अंतिम टप्प्यात असून औपचारिक प्रवेशाची वेळ निश्चित करण्यात आली असल्याच्या चर्चा रंगत आहेत.

**पार्थ पवारांच्या प्रकरणानंतर वाढलेला दबाव**

राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीशी संबंधित जमीन गैरव्यवहार प्रकरणाचा तपास उचलून धरल्यानंतर अजित पवार गट राजकीयदृष्ट्या दबावाखाली आल्याचे विश्लेषकांचे मत आहे. हाच कमकुवत टप्पा साधत भाजपने गडी ओढण्याची रणनीती गतीमान केल्याचे बोलले जात आहे.

**भाजपचा प्लॅन स्पष्ट : ‘पिंपरी-चिंचवडमध्ये शत-प्रतिशत भाजपा’**

२०१७ च्या निवडणुकांमध्ये भाजपाने ७७ जागा जिंकत सत्ता मिळवली होती, तर राष्ट्रवादी ३२ जागांवर होती. परंतु या वेळी भाजपाने—१२८ पैकी सर्व जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय राष्ट्रवादीतील निवडणूक जिंकण्याची क्षमता असलेल्या चेहऱ्यांना ‘इनहाऊस’ करण्याची मोहीम

हापौर, माजी अध्यक्ष, तळी गटाचे समन्वयक यांच्याशी संपर्क

...असा ‘त्रिसूत्री राजकीय प्लान’ राबवण्यास सुरुवात केली आहे.

भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनीही हे संकेत अधिक मजबूत करत म्हटले आहे.

“भाजपाला १०० जागांवर विजय मिळवण्याची क्षमता आहे. राष्ट्रवादीतील दहाहून अधिक माजी नगरसेवक आमच्याशी संपर्कात असून त्यांनी प्रवेशाची इच्छा व्यक्त केली आहे.”

त्यामुळे आता राष्ट्रवादी–भाजप संघर्ष निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे.

**नेतृत्व ढासळल्याच्या संकेताने राष्ट्रवादीत चिंता**

पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचा मजबूत कॅडर, वारकरी समाजाचा प्रभाव व अजित पवारांची विकासाची छबी आजवर निर्णायक ठरली आहे. मात्र–काही प्रमुख नेत्यांनी फोन बंद ठेवणे

बैठकींना अनुपस्थिती

- पार्थ पवारांच्या कथित जमीन प्रकरणानंतर राष्ट्रवादी दबावात
- माजी नगरसेवक, पदाधिकारी, दोन माजी महापौर भाजपाच्या रडारवर
- भाजपचे लक्ष्य स्पष्ट – ‘महापालिकेत १०० जागा पार’
- महायुतीत संघर्ष वाढला; भाजप-राष्ट्रवादी संबंध तणावपूर्ण
- शिंदे नाराजीनंतर भाजपाचा मोर्चा अजित पवारांकडे
- भाजप शहराध्यक्षांचा दावा – ‘दहाहून अधिक नेते येण्यास तयार’
- निवडणुका जवळ; पिंपरी-चिंचवडमध्ये वाढला राजकीय ताण
- राष्ट्रवादीत संभ्रम, भाजपात उत्साह – कार्यकर्त्यांमध्ये चर्चा गरम
- २०१७ च्या निकालाची पुनरावृत्ती नव्हे, यावेळी ‘शत-प्रतिशत भाजप’–रणनीती महापालिकेच्या तिकिटासाठी मोठी चढाओढ सुरू
- फोडाफोडीने महायुतीत ‘मिठाचा खडा’ – आरोप प्रत्यारोप सुरूच

पक्षफंड व मोर्चेबांधणीतील कमकुवत हालचाल. या संकेतांमुळे राष्ट्रवादीमध्ये संभ्रम व निरुत्साह वाढल्याचं दिसत आहे.

**महायुतीत अदृश्य गृहयुद्ध**

भाजप–राष्ट्रवादी–शिवसेना गटांमधील समन्वयाच्या चर्चा वरवर सुरू असल्या तरी वास्तविकता वेगळीच सांगते.

शिंदे गटाला तिकीट वाटपात भाजप बाजूला सारत असल्याची नाराजी राष्ट्रवादीला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची वाढती घुसखोरी आणि भाजपचा “एकट्याने सत्ता” हा स्पष्ट रोडमॅप. या सर्वांमुळे महायुती पेक्षा स्वतंत्र विस्तार हे तीनही पक्षांचे लक्ष्य झाल्याचं आता स्पष्ट होत आहे.

**पुढचा डाव कोणाचा?**

राजकीय तज्ज्ञांचे मते, “ही निवडणूक केवळ विकास किंवा महापालिकेची नाही, तर पिंपरी-चिंचवडमधील नेतृत्वाचा वर्चस्वाचा प्रश्न आहे. अजित पवारांचा प्रभाव आणि भाजपाचे संघटन या दोन्हींचा संघर्ष आता शिगेला जाईल.”

## जागतिक पुरवठा साखळी मजबूत
## जगप्रसिद्ध जीई ऐरोस्पेसची चाकणमध्ये गुंतवणूक

# विमान निर्मिती क्षेत्रात पुण्याची आगेकूच!

## चाकण प्रकल्पाचा मोठा विस्तार

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विमान इंजिन निर्मिती क्षेत्रातील जीई ऐरोस्पेस कंपनीने पुण्यात आणखी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीच्या पुण्यातील उत्पादन प्रकल्पाची क्षमता वाढवण्यासाठी १.४ कोटी डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा कंपनीने केली आहे.**



जीई एरोस्पेसचा चाकण औद्योगिक क्षेत्रात उत्पादन प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २०१४ मध्ये झाले होते. या प्रकल्पाला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीने या प्रकल्पात ३ कोटी डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती. त्यातील १.४ कोटी डॉलरची गुंतवणूक कंपनीकडून आता केली जाणार आहे. ही गुंतवणूक अद्ययावत उत्पादन प्रक्रिया व ऑटोमेशनच्या माध्यमातून प्रगत इंजिनच्या सुट्या भागांच्या निर्मितीसाठी करण्यात येणार आहे. या प्रकल्पातून जगभरात अत्याधुनिक विमान इंजिनच्या सुट्या भागांचा पुरवठा केला जाणार आहे.याबाबत जीई एरोस्पेसच्या चाकणमधील प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजीत सिंग म्हणाले की, पुण्यातील आमच्या प्रकल्पाचा क्षमता विस्तार होत आहे.

देशभरातील पुरवठादारांच्या जाळ्याच्या पाठिंब्यावर आमच्या प्रगत व्यावसायिक जेट इंजिनसाठी सुटे भाग पुरविले आहेत. यामध्ये सुरक्षितता व दर्जाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. या नवीन गुंतवणुकीमधून मेक इन इंडिया उपक्रमाप्रती आणि जागतिक ऐरोस्पेस उत्पादनामध्ये भारताची भूमिका प्रगत करण्याची आमची कटिबद्धता दिसून येते.बहुव्यवसाय उत्पादन केंद्र म्हणून सुरूवात केलेला पुण्यातील प्रकल्पाच्या स्थापनेपासून जीई ऐरोस्पेसच्या जागतिक व्यावसायिक इंजिन निर्मिती प्रकल्पांसाठी उच्च तंत्रज्ञानाच्या ऐरोस्पेस भागांचा पुरवठादार बनला आहे. पुण्यातील या प्रकल्पाला ३०० हून अधिक पुरवठादारांच्या जाळ्याचे पाठबळ आहे. भारतातील २ हजार २०० हून अधिक पुरवठादार जीई ऐरोस्पेस सहयोगींपैकी आहेत. गेल्या १० वर्षांमध्ये या प्रकल्पाने ५ हजारांहून अधिक उत्पादन सहयोगींना अचूक उत्पादन प्रक्रियेमध्ये प्रशिक्षण दिले आहे, तसेच स्थानिक गुणवत्ता घडवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पुण्यातील प्रकल्पाच्या यशाचे श्रेय जीई ऐरोस्पेसच्या लीन ऑपरेटिंग मॉडेल फ्लाइट डेकला जाते. हे मॉडेल सुरक्षितता, दर्जा व कार्यक्षमतेवर भर देते.

फ्लाइट डेकसह प्रकल्पाने अपव्यय कमी केला असून, प्रक्रिया कार्यक्षमता सुधारली आहे. तसेच, शॉप-फ्लोअर सुरक्षितता वाढवण्यासोबत उत्पादन वाढवले आहे. विमान इंजिनच्या महत्त्वपूर्ण सुट्या भागांसाठी नवीन उत्पादन सुविधा या प्रकल्पात लवकरच सुरू होत आहे.विमान इंजिन निर्मिती क्षेत्रातील जीई ऐरोस्पेस कंपनीने पुण्यात आणखी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीच्या पुण्यातील उत्पादन प्रकल्पाची क्षमता वाढवण्यासाठी १.४ कोटी डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा कंपनीने केली आहे. जीई एरोस्पेसचा चाकण औद्योगिक क्षेत्रात उत्पादन प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २०१४ मध्ये झाले होते. या प्रकल्पाला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीने या प्रकल्पात ३ कोटी डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती.आता केली जाणार आहे. ही गुंतवणूक अद्ययावत उत्पादन प्रक्रिया व ऑटोमेशनच्या माध्यमातून प्रगत इंजिनच्या सुट्या भागांच्या निर्मितीसाठी करण्यात येणार आहे. या प्रकल्पातून जगभरात अत्याधुनिक विमान इंजिनच्या सुट्या भागांचा पुरवठा केला जाणार आहे.याबाबत जीई एरोस्पेसच्या चाकणमधील प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजीत सिंग म्हणाले की, पुण्यातील आमच्या प्रकल्पाचा क्षमता विस्तार होत आहे.

### १.४ कोटी डॉलरच्या गुंतवणुक

यामध्ये सुरक्षितता व दर्जाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. या नवीन गुंतवणुकीमधून मेक इन इंडिया उपक्रमाप्रती आणि जागतिक ऐरोस्पेस उत्पादनामध्ये भारताची भूमिका प्रगत करण्याची आमची कटिबद्धता दिसून येते.बहुव्यवसाय उत्पादन केंद्र म्हणून सुरूवात केलेला पुण्यातील प्रकल्पाच्या स्थापनेपासून जीई ऐरोस्पेसच्या जागतिक व्यावसायिक इंजिन निर्मिती प्रकल्पांसाठी उच्च तंत्रज्ञानाच्या ऐरोस्पेस भागांचा पुरवठादार बनला आहे.

# पुणे महापालिकेची प्रारूप मतदार यादी जाहीर

## 35 लाख 51 हजार 469 मतदारांची नोंद असून 3 लाखांहून अधिक मतदार

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यभरात नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषद आणि महापालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या कालावधीत होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रत्येक राजकीय पक्षांकडून बैठका, मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. त्या सर्व घडामोडी दरम्यान प्रत्येक प्रभागात किती हजार मतदार असणार आहेत**



याकडे लोकप्रतिनिधींचे लक्ष लागलेले असताना आज राज्यातील विविध महापालिकांची प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. पुणे शहरात ३५ लाख ५१ हजार ४६९ मतदारांची नोंद असून ३ लाखांहून अधिक मतदार दुबार असल्याचे यामध्ये स्पष्ट झाले आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नवल किशोर राम म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यात महापालिका निवडणुका येत्या कालावधीमध्ये होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील ४१ प्रभाग आणि तेथील आरक्षण यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहे. शहरातील सर्व ४१ प्रभागातील प्रारुप मतदारांची संख्या आज जाहीर करण्यात आली असून ३५ लाख ५१ हजार ४६९ मतदारांची नोंद आहे. तर प्रभाग क्रमांक ९ हा सर्वाधिक मतदार असलेला प्रभाग ठरलेला आहे. त्या प्रभागात १ लाख ६० हजार २४२ मतदार आहेत. तर सर्वाधिक कमी प्रभाग क्रमांक ३९ ठरला आहे. त्या प्रभागात ६२ हजार २०५ इतके मतदार आहेत. लाख ५१ हजार ४६९ मतदारांमध्ये ३ लाखांहून अधिक मतदार हे दुबार असल्याचे आढळून आले आहेत. हे दुबार मतदार निवडणुक आयोगामार्फत कमी करण्याची कार्यवाही केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### ३ लाखांहून अधिक दुबार मतदार

निवडणुक आयोगाच्या आदेशानुसार आम्ही आज प्रारुप मतदार यादी प्रकाशित केली आहे. या यादी बाबत मतदारांना हरकती किंवा सूचना नोंदवायची असल्यास, २० नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान पुणे महापालिका मुख्य इमारत निवडणूक कार्यालय, तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालय या ठिकाणी मतदारांनी आपल्या हरकती सूचना नोंदवा, असे आवाहन त्यांनी केले.राज्यभरात नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषद आणि महापालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या कालावधीत होणार आहेत.

## स्तुत्य उपक्रमः शहरातील सुमारे पाच हजार महिला कष्टकरी-घर कामगारांची नोंदणी

# घर कामगार- कष्टकरी महिलांचा होणार सन्मान!

## आमदार महेश लांडगे यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त आदर्श उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या, घराघरांत स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या आणि स्वतःच्या आयुष्यातील संघर्षाशी सतत दोन हात करणाऱ्या घरकामगार व कष्टकरी महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त शहरात 100 हून अधिक उपक्रम आयोजित केले आहेत. यावर्षीचा वाढदिवस सफाई-घर कामगार माता-भगिनींना समर्पित करण्याचा संकल्प केला असून, सुमारे ५ हजार माता-भगिनींचा सन्मान होणार आहे, अशी माहिती उपक्रमाचे समन्वयक अमोल बांगर यांनी दिली.**




आमदार महेश लांडगे यांचा वाढदिवस प्रतिवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी तब्बल 100 हून अधिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये सांस्कृतिक, आरोग्य विषयक आणि क्रीडा स्पर्धांचा समावेश आहे. आमदार लांडगे यांच्या “आयुष्याचा सुवर्णमहोत्सव आणि समाजसेवेचा रौप्य महोत्सव” असा योग जुळून आला असून, विधायक उपक्रमांनी हा आनंदोत्सव साजरा केला जात आहे. दि. 23 नोव्हेंबर ते दि. 30 नोव्हेंबर 2025 दरम्यान, प्रत्येक कार्यक्रमस्थळी सफाई व घर कामगार माता-भगिनींचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे.

समन्वयक अमोल बांगर म्हणाले की, दिवसभर उन्हात कष्ट करणाऱ्या, मजुरीवर संसार चालवणाऱ्या, मुलांच्या भवितव्याची चिंता मनात बाळगूनही रोज नवी उमेद घेऊन उठणाऱ्या या स्त्रियांचा संघर्ष पिंपरी–चिंचवडच्या कामगार वस्त्यांत सर्वत्र दिसून येतो. लहानपणापासून मजुरीच्या चक्रात गुरफटलेल्या, तारुण्य संकटात हरवून बसलेल्या आणि परिस्थितीशी झुंज देत उभ्या राहणाऱ्या या महिलांना इतक्या मोठ्या प्रमाणावर सामाजिक सन्मानाचे वलय पहिल्यांदाच मिळत आहे.

### महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम

महिला सक्षमीकरणाचा ध्यास घेतलेले आमदार महेश लांडगे यांनी राज्यातील सर्वात मोठी इंद्रायणी थडी जत्रा आयोजित करून हजारो महिलांना स्वावलंबनाचा मार्ग दिला. या जत्रेत सुमारे १ हजार बचतगटांना व्यावसायिक प्रोत्साहन, बाजारपेठ, विक्रीची संधी आणि आर्थिक बळ मिळते. माता-भगिनींच्या रक्षणासाठी कायम आग्रही राहिलेल्या आमदार लांडगे यांच्या या कार्याचा आदर्श घेऊनच घरकामगार व सफाई कामगार महिलांचा सन्मान उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### आरोग्य, शिक्षण आणि लाभ योजनांकडे महिला केंद्रबिंदू

या कार्यक्रमात महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, शासकीय योजनांचा लाभ, सामाजिक समानतेचे हक्क, मोफत रक्तदान योजनेचा लाभ, वैद्यकीय सुविधा आणि मुलांच्या शिक्षणाविषयी मार्गदर्शन या महत्त्वाच्या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात येणार आहे. यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू असून, शहरातील अनेक महिलांनी त्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. आतापर्यंत सुमारे 4 हजार 700 महिलांनी अर्ज दाखल केले आहेत. सर्व अर्जदार महिलांना विशेष भेटवस्तू, मानपत्र आणि शासकीय योजनांचे माहितीपत्रक देण्यात येणार आहे. दि. 27 नोव्हेंबर 2025 रोजी भोसरी येथील गावजत्रा मैदानात आमदार लांडगे यांचा वाढदिवस अभिष्ठचिंतन सोहळा होईल. यावेळी घरकामगार- कष्टकरी माता-भगिनींचा सन्मान करण्यात येणार आहे. दि. 25 नोव्हेंबरपर्यंत महिलांना नोंदणी करता येईल.

> “ महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण यासाठी कायम आग्रही असलेले आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम-उपक्रम होत आहेत. घरकामगार आणि कष्टकरी माता-भगिनींना केवळ सन्मान देणे हा उद्देश नाही; त्यांच्या गरजांपर्यंत शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ पोहोचवणे ही आमची जबाबदारी आहे. मोफत रक्तदान योजना, वैद्यकीय सुविधा आणि मुलांच्या शिक्षणाविषयी मार्गदर्शन यासाठी आम्ही विहित नमुन्यात अर्ज स्विकारत आहोत. संघर्षाशी झुंज देणाऱ्या प्रत्येक महिलेला ही मदत पोहोचावी, हीच आमची भूमिका आहे.”
>
> – **अमोल बांगर,** समन्वयक.

---

## पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

### 27 नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करून प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीवर नागरिकांना हरकती व सूचना दाखल करण्यासाठी २० नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५ हा कालावधी देण्यात आला आहे.**




नागरिकांकडून येणाऱ्या हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तसेच सावित्रीबाई फुले सभागृह येथे मुख्यालय स्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी दिली.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १ ते ३२ करीता तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्यांबाबत काही हरकती व सूचना दाखल करावयाच्या असतील, तर अशा मतदारांनी नमुना ‘अ’ मध्ये आणि तक्रारदारांनी नमुना ‘ब’ मध्ये दिलेल्या मुदतीमध्ये त्या दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांचा विचार केला जाणार नाही, अशी माहिती महापालिका निवडणूक विभागातून देण्यात आली. सदर प्रारूप मतदार याद्या प्रभागनिहाय माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रति पृष्ठ रु. २/- याप्रमाणे सावित्रीबाई फुले सभागृह येथे विक्रीस उपलब्ध आहेत, अशी माहिती देखील निवडणूक विभागातून देण्यात आली.

### राज्य निवडणूक आयोगाचा मतदार यादी कार्यक्रम

प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिद्ध करणे : २० नोव्हेंबर २०२५

प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करणे : २० नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५

प्रारूप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे : ५ डिसेंबर २०२५

मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे : ८ डिसेंबर २०२५

मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे : १२ डिसेंबर २०२५

> प्रारूप मतदार यादी ही आगामी निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. शहरातील प्रत्येक मतदाराने स्वतःचे नाव योग्यरित्या नोंदले आहे का, याची खात्री करून आवश्यक असल्यास हरकती व सूचना वेळेत दाखल करणे अत्यावश्यक आहे. प्रारूप मतदार यादीवर येणाऱ्या हरकती व सूचनांवर निवडणूक आयोगाच्या नियमान्वये कार्यवाही करण्यात येईल.
>
> – **विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.



## भूमिका

# स्त्री शिक्षण आणि कायदे

**स्त्री शिकली की बेताल होईल", "स्त्री शिक्षण हे कुटुंबव्यवस्था व समाजव्यवस्थेला घातक आहे", "स्त्रिया शिकल्या तर त्या विधवा होतील" या आणि अशा काळात फुले-शाहू-आंबेडकर-कर्वे यांसारख्या सुधारकांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, घेतलेले कष्ट व दूरदृष्टी यामुळे आज स्त्रीशिक्षण सुलभ झाले आहे.**

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे कायदे केले. स्त्रियांच्या छळास प्रतिबंध करणारा कायदा, अनौरस संतती व जोगिणींविषयी कायदा, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा हे स्त्रीसबलीकरणासाठी, स्त्रियांना दास्यातून बाहेर काढण्यासाठी केलेले कायदे फार मोलाचे आहेत. छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या कायद्यांच्या तरतुदीप्रमाणेच काही तरतुदी पुढे भारतीय राज्यघटनेतही समाविष्ट करण्यात आल्या.भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ नुसार समानांना समान अधिकार व कायद्याचे समान संरक्षण दिलेले आहे. अनुच्छेद १५ नुसार राज्य, जात, धर्म, लिंग, पंथ, जन्माचे ठिकाण यावर आधारित भेदभाव केला जाणार नाही. म्हणजेच स्त्रियांना शिक्षणाच्या समान संधी मिळतील. अनुच्छेद १६ मध्येही रोजगार व शिक्षण यामध्येही समान संधी मिळेल, असे सांगितले आहे. तसेच अनुच्छेद १५ (३)



मध्ये स्त्रिया, लहान मुले यासाठी राज्य कायद्यात विशेष तरतूद करू शकते. यात शिक्षणाबाबत प्रोत्साहन देण्याबाबत तरतूद अपेक्षित आहे. अनुच्छेद ४६ नुसार कमकुवत व मागास गटातील मुलांसाठी राज्यास शैक्षणिक व आर्थिक हितासाठी विशेष उपाययोजना करता येते. शिक्षण हक्क कायदा (RIGHT TO EDUCATION IN ACT 2009) हा कायदा स्त्रियांच्या शिक्षणाचा समान अधिकार संरक्षित करतो. स्त्रियांना भेदभाव विरहीत, सुरक्षित शिक्षण देण्याची हमी देतो. हा कायदा ६ ते १४ वर्षे वयोगटातील देशातील सर्वच मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार देतो. शिक्षणास मूलभूत हक्क मानले गेलेले आहे. शाळा व सरकार यांच्यावर मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. (मुलगा-मुलगी भेद करता येणार नाही.) या कायद्यान्वये दुर्बल व वंचित घटकातील मुलांची काळजी घेताना खासगी शाळांमध्येही दुर्बल व वंचित घटकातील मुलांसाठी २५% जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे. मुलांना गुणवत्तापूर्वक शिक्षणासाठी आवश्यक वसतिगृह, आरोग्यसुविधा संबंधित संस्थांनी पुरवाव्यात अशी तरतूद आहे. या कायद्यानुसार मुलांना शाळेत पाठविण्यासाठी पालकांवरही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाने स्त्रियांना दिलेला शिक्षणाच्या हक्क अधिकारावर आधारित कायद्यांनुसार राज्य व केंद्राच्या काही योजना आहेत - बेटी बचाव, बेटी पढाओ मुलीचा जन्मदर सुधारून त्यांना शिक्षण, आरोग्य व निर्भय वातावरण मिळणे हा या योजनेचा उद्देश आहे. महिला शक्ती योजना महिला शक्ती केंद्र योजनेनुसार ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील स्त्रियांसाठी शिक्षण, रोजगार व कौशल्य विकासासाठी प्रयत्न केले जातात. स्त्रियांना आर्थिक सहाय्य व प्रशिक्षण मिळण्यासाठी महिला उद्दमिता योजना आहे. राज्य शासनानेही वेगवेगळ्या शिष्यवृत्ती, सुविधा याद्वारे स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. लिंगभेद टाळण्यासाठी संस्था, शाळा व शिक्षक यांनी सुरक्षित शैक्षणिक वातावरण तयार करणे आवश्यक आहे. संविधानाने दिलेले अधिकार, संविधानावर आधारित शिक्षण हक्क कायदा तसेच केंद्र व राज्याच्या विविध तरतुदी असल्या तरीही ग्रामीण-आदिवासी भागात असंख्य मुली शिक्षणापासून वंचित आहेत. शैक्षणिक संस्थांमध्ये शाळा-कॉलेजमध्ये असुरक्षित वातावरण आहे. शिक्षक-कर्मचारी वर्गाच्या गैरवर्तनातून अनेक गंभीर प्रकरणं समोर येत आहेत. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने न होता कायदा पायदळी तुडवला जात आहे. खासगी संस्थांमध्ये दुर्बल, वंचित घटकांसाठी २५% राखीव जागा ठेवल्या जातात का? ठेवल्या तर त्या दिल्या जातात का ? मुलींना पुरेशी सुरक्षा, सुविधा, वसतिगृह उपलब्ध आहेत का? आई-वडिलांची गरिबी म्हणून अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते.

## प्रासंगिक »

### अढळ अधिष्ठान

***भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश पदावरून निवृत्त होणार आहेत.***

या पदावर त्यांना जवळपास ६ महिन्याचा कार्यकाळ मिळाला. या कमी कार्यकाळातही त्यांनी भारतीय संविधानाची मूलभूत चौकट आणि राज्यघटनेची, तसेच न्यायव्यवस्था आणि देशातील लोकशाहीची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केले. सरन्यायाधीशांनी प्रयागराज येथे नुकतीच भेट दिली, त्यावेळी त्यांनी भारतीय राज्यघटनेचे महत्व विशद करून सांगितले.

शेजारील पाकिस्तान, बांगलादेश यासारख्या देशातील अस्थिरतेविषयी बोलताना त्यांनी राज्यघटनेच्या सामर्थ्याविषयी भाष्य केले. भारतापुढे आज देशांतर्गत आणि देशाबाहेरील शक्तींची आव्हाने आहेत. मात्र अशाही स्थितीत भारताने आपली एकजूट कायम ठेवली आहे. भारतीय नागरिकांचा स्वतःच्या मूलभूत अधिकारांवर असलेला विश्वासच याला कारणीभूत असल्याचे सरन्यायाधीश गवई यांनी सांगितले.

न्यूयॉर्कच्या महापौरपदी निवड झाल्यानंतरही झोहरान ममदानी यांच्या संबंधात डाव्या आणि उजव्या गोटात तीव्र उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहेत. अमेरिकेत महापौर हे केवळ शोभेचे पद नसून त्याला शहराविषयीचे निर्णय घेण्याचे मोठे अधिकार असतात. जानेवारीत ते सूत्रे हाती घेतील.

# आश्वासन पूर्ततेची कसोटी

भांडवलशाहीची राजधानी मानल्या जाणाऱ्या न्यूयॉर्कसारख्या जगातील अत्यंत महत्त्वाच्या शहरात अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा टोकाचा विरोध असतानाही झोहरान ममदानी घवघवीत मताधिक्याने महापौरपदाच्या निवडणुकीत विजयी झाले. जानेवारीच्या प्रारंभी पदाची सूत्रे हा ३४ वर्षे वयाचा या शहराचा पहिला दक्षिण अशियाई मुस्लीम महापौर हाती घेणार आहे.

या शहराच्या सुमारे ८६ लाख लोकांमध्ये अवघे ३० टक्के गौरवर्णीय असल्याने ममदानी निवडून येण्यास मदतच झाली. अमेरिकेचे एकूणच राजकारण राजकीय विचारसरणीच्या मध्यबिंदूच्या उजवीकडे झुकलेले आहे. झोहरान यांचा अजेंडा थोडासा डावीकडे झुकलेला आहे. म्हणूनच ट्रम्प आणि त्यांच्या समर्थकांना ते अतिडावे आणि कम्युनिस्ट वाटतात. त्यातूनच येथील उद्योगपतींनी त्यांचे पैसे संपण्याची वाट न बघता ममदानी निवडून येताच न्यूयॉर्कबाहेर स्थलांतर करायला सुरुवात केली आहे. याउलट



या विजयाने डाव्यांच्या आशा पल्लवित झालेल्या दिसतात. ममदानी यांना खुद्द डेमोक्रेटिक पक्षातही सुरुवातीला मोठा विरोध होता. धनाढ्य शक्तींनी त्यांच्या विरोधात रान उठविले असताना सर्वसामान्य मतदारांनी त्यांच्या मागे आपले बळ उभे केले.

सुमारे ९० हजारांवर कार्यकर्ते त्यांच्या प्रचारात हिरिरीने उतरले. स्थलांतरित, मुस्लीम, दक्षिण अशियाई, अफ्रिकन आणि लौटन समुदायापर्यंत बहुभाषिक माध्यमातून संवाद साधून पारंपरिक राजकारणातील दानशूर उद्योगपतींवर अवलंबून राहण्याची प्रणाली या तरुणाने मोडीत काढली. देशात स्थलांतरितांविरोधात वातावरण तापलेले असताना तसेच इस्लामोफोविया वाढलेला असताना हा मूळ भारतीय वंशाचा स्थलांतरित यशस्वी होतो, हे खचितच दखल घेण्याजोगे आहे. न्यूयॉर्क मधील बहुसंख्य अनिवासी भारतीय हिंदुत्ववादी असल्याने त्यांनी या उमेदवाराला कितपत मते दिली असतील, याविषयी शंका आहे; पण त्यांना बऱ्याच ज्यूंनी मात्र मते दिली. कारण, ममदानी इस्रायलच्या धोरणाविरोधात असले, तरी ज्यूंच्या विरोधात नव्हते.न्यूयॉर्क हे कॉस्मॉलिटिन शहर जगाची एक छोटी प्रतिकृती मानली जाते. इथे ७०० वर भाषा बोलल्या जातात. अब्जाधीशांची संख्या १२३ असून त्यांची एकत्रित संपत्ती ७५९ अब्ज डॉलर्स इतकी आहे. विविध वंशांच्या, धर्माच्या लोकांनी या शहरात वैविध्य आणले. इथे सतत नवनव्या संधी निर्माण होत गेल्या. विविध उद्योग बहरले. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ विविध देशांमधून येत राहिले. शहराचे चैतन्य टिकविण्यासाठी बाहेरून येणारे स्थलांतरित किती महत्त्वाची भूमिका बजावतात, हे इथे राहिल्यावर समजते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

पार्थ पवारला क्लीनचिट ? अजित पवारांनी राजीनामा द्यावा : अंजली दमानिया

# पार्थ पवारला क्लीनचिट नाहीच!

## अजित पवार यांनी राजीनामा द्यावा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील जमिनीच्या गैरव्यवहाराप्रकरणी पार्थ पवार यांना क्लीनचिट मिळालेली नाही, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. नवी कागदपत्रे माध्यमांना दाखवत या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाला असल्याने उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.**



मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी घेत लेल्या पत्रकार परिषदेत दमानिया म्हणाल्या, १६ जून रोजी दुपारी १ वाजता ॲड. तृप्ती ठाकूर यांनी पोलिसांना फोन करून बॉटेनिकल गार्डन परिसरात सिक्युरिटी गार्डना प्रवेश नाकारला जात असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक मुंडे आणि पथकाने घटनास्थळी पोहोचून संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. तेथे बॉटेनिकल गार्डनचे प्रमुख बाळासाहेब कदम, महेश पुज- री आणि सेफ सिक्युरिटी सर्व्हिसेसचे गार्ड उपस्थित होते.

ती जागा बॉटेनिकल गार्डनची असल्याने प्रवेश थांबविला होता. अमेडियाच्या लोकांनी कोणतेही कागदपत्र न दाखवता जागा रिकामी करा, असा दबाव टाकल्याची नोंद स्टेशन डायरीत केली आहे, असे दमानिया म्हणाल्या, अमेडियाचे लोक तिथे बाऊन्सर घेऊन कसे पोहोचले? या दिवशी पार्थ पवार कुठे होते याचा शोध घेण्यासाठी मोबाइल टॉवर लोकेशन तपासण्याची मागणीही त्यांनी केली. पार्थ पवारांना कोणत्याही प्रकारची क्लीनचिट मिळालेली नाही आणि प्रकरणात अडकलेला प्रमुख आरोपी येवले नावाचा अधिकारी याचा अंतरिम जामीन हा या प्रकरणातील सत्य बाहेर येऊ नये म्हणूनच घेतला गेल्याचा आरोप दमानिया यांनी केला. जर येवलेला पोलिसांनी अटक केली, तर तो पार्थ पवार यांचे नाव घेईल, अमेडिया इंटरप्रायजेसचा व्यवहार उघड करेल. त्यामुळेच त्याला जामीन मंजूर करण्यात आला. पुण्यातील जमिनीच्या गैरव्यवहाराप्रकरणी पार्थ पवार यांना क्लीनचिट मिळालेली नाही, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. नवी कागदपत्रे माध्यमांना दाखवत या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाला असल्याने उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी घेत लेल्या पत्रकार परिषदेत दमानिया म्हणाल्या, १६ जून रोजी दुपारी १ वाजता ॲड. तृप्ती ठाकूर यांनी पोलिसांना फोन करून बॉटेनिकल गार्डन परिसरात सिक्युरिटी गार्डना प्रवेश नाकारला जात असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक मुंडे आणि पथकाने घटनास्थळी पोहोचून संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. तेथे बॉटेनिकल गार्डनचे प्रमुख बाळासाहेब कदम, महेश पुज- री आणि सेफ सिक्युरिटी सर्व्हिसेसचे गार्ड उपस्थित होते. ती जागा बॉटेनिकल गार्डनची असल्याने प्रवेश थांबविला होता. अमेडियाच्या लोकांनी कोणतेही कागदपत्र न दाखवता जागा रिकामी करा, असा दबाव टाकल्याची नोंद स्टेशन डायरीत केली आहे, असे दमानिया म्हणाल्या, अमेडियाचे लोक तिथे बाऊन्सर घेऊन कसे पोहोचले? या दिवशी पार्थ पवार कुठे होते याचा शोध घेण्यासाठी मोबाइल टॉवर लोकेशन तपासण्याची मागणीही त्यांनी केली.

क्लीनचिट मिळालेली नाही आणि प्रकरणात अडकलेला प्रमुख आरोपी येवले नावाचा अधिकारी याचा अंतरिम जामीन हा या प्रकरणातील सत्य बाहेर येऊ नये म्हणूनच घेतला गेल्याचा आरोप दमानिया यांनी केला. जर येवलेला पोलिसांनी अटक केली, तर तो पार्थ पवार यांचे नाव घेईल, अमेडिया इंटरप्रायजेसचा व्यवहार उघड करेल. त्यामुळेच त्याला जामीन मंजूर करण्यात आला.

### संपूर्ण परिस्थितीची पाहणी

१६ जून रोजी दुपारी १ वाजता ॲड. तृप्ती ठाकूर यांनी पोलिसांना फोन करून बॉटेनिकल गार्डन परिसरात सिक्युरिटी गार्डना प्रवेश नाकारला जात असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक मुंडे आणि पथकाने घटनास्थळी पोहोचून संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. तेथे बॉटेनिकल गार्डनचे प्रमुख बाळासाहेब कदम, महेश पुज- री आणि सेफ सिक्युरिटी सर्व्हिसेसचे गार्ड उपस्थित होते.

# रब्बी हंगामातील पेरण्या संथ गतीने का ?

## रब्बी हंगामासाठी वेळेत शेतजमिनी तयार न झाल्यामुळे पेरण्या

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात रब्बी हंगामात ५७.८० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या होतात. यंदा आजपर्यंत १६.५१ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. सरासरीच्या तुलनेत फक्त २९ टक्के पेरण्या झाल्या आहेत. पावसाळा लांबल्यामुळे खरीप पिके काढून रब्बी हंगामासाठी वेळेत शेतजमिनी तयार न झाल्यामुळे पेरण्या रखडल्या आहेत.**

रब्बी ज्वारीच्या पेरण्या हंगामाच्या सुरुवातीला होतात ज्वारीच्या पेरण्यांना उशिर झाला तर पिकावर परिणाम होतो. रोगांचा प्रादुर्भावामुळे उत्पादन कमी येते. त्यामुळे शेतकरी पहिल्या टप्प्यात ज्वारीच्या पेरण्या करतात. पण, यंदा ज्वारीच्या पेरण्याही रखडल्या आहेत. सरासरीच्या ४३ टक्के पेरण्या झाल्या आहेत. ज्वारीचे सरासरी क्षेत्र सुमारे १५ लाख हेक्टर क्षेत्र असून, आतापर्यंत ६.५० लाख हेक्टरवरच पेरणी झाली आहे. गव्हाचे क्षेत्र सुमारे १२ लाख हेक्टर आहे, तर पेरण्या जेमतेम १.३० लाख हेक्टरवरच झाल्या आहेत. हरभरा लागवडी खालील क्षेत्र २५ लाख हेक्टर आहे, तर पेरण्या ६.८७ लाख हेक्टरवर झाल्या आहेत.ज्वारी, गव्हू, मक्यासह अन्य तृणधान्यांच्या एकूण पेरण्या ३० टक्के म्हणजे, ९.२५ लाख हेक्टरवर गेल्या आहेत. हरभऱ्यासह



अन्य कडधान्यांच्या पेरण्या २७ टक्क्यांवर म्हणजे, ७.११ लाख हेक्टरवर आणि तेलबियांच्या पेरण्या २० टक्क्यांवर म्हणजे जेमतेम १.३० लाख हेक्टरवर गेल्या आहेत.यंदा पावसाळा लांबल्यामुळे खरीप पिके वेळेत निघाली नाहीत. त्यामुळे रब्बी हंगामासाठी शेतजमिनी वेळेत तयार झाल्या नाहीत. त्यामुळे पेरण्या संथगतीने सुरू आहेत. पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे सरासरी इतक्या पेरण्या होतील. डिसेंबरअखेरपर्यंत पेरण्या सुरू राहतील. ऊसतोडणी झालेल्या शेतात जानेवारीपर्यंत लागवडी होतात, अशी माहिती कृषी विभागाचे संचालक रफीक नाईकवाडी यांनी दिली. महाराष्ट्रामध्ये रब्बी पेरणी साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये मान्सूनचा पाऊस संपल्यानंतर केली जाते. या हंगामातील प्रमुख पिके ज्वारी, गहू, हरभरा, गहू, मोहरी, बार्ली आणि वाटाणे आहेत. पेरणी शक्यतो ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात केली जाते आणि कापणी जानेवारी ते एप्रिल या काळात केली जाते. विशेषतः पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागांमध्ये रब्बी ज्वारीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. ज्वारीसाठी ऑक्टोबरचा पहिला पंधरवडा पेरणीसाठी चांगला मानला जातो.

### डिसेंबरपर्यंत सुरू राहणार पेरण्या

राज्यात रब्बी हंगामात ५७.८० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या होतात. यंदा आजपर्यंत १६.५१ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. सरासरीच्या तुलनेत फक्त २९ टक्के पेरण्या झाल्या आहेत. पावसाळा लांबल्यामुळे खरीप पिके काढून रब्बी हंगामासाठी वेळेत शेतजमिनी तयार न झाल्यामुळे पेरण्या रखडल्या आहेत.

## पंतप्रधान मोदींचे कौतुक

## भाजपा आवडतेय, काँग्रेसमध्ये कशाला थांबलात?

# काँग्रेस नेत्याने शशी थरूरांना सुनावले

## काँग्रेसचे वरिष्ठ नेते नाराज

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक केल्याने काँग्रेसचे वरिष्ठ नेते नाराज झाल्याचे चित्र आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामनाथ गोयंका व्याख्यानमालेत केलेल्या भाषणाची शशी थरूर यांनी स्तुती केल्यामुळे काँग्रेसमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. अनेक नेत्यांनी त्यांच्या विधानांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून स्पष्टीकरण मागितले आहे. ज्येष्ठ नेते संदीप दीक्षित यांनी थरूर यांच्यावर उघडपणे टीका केली आहे. त्यांचे मत पक्षाच्या भूमिकेशी विसंगत असल्याचे सांगून, दीक्षित यांनी थरूर यांच्या राजकीय निष्ठेबद्दल शंका व्यक्त केली आहे. शशी थरूर पंतप्रधान मोदींविषयी काय म्हणाले? काँग्रेस नेत्यांनी त्यांच्यावर काय टीका केली? जाणून घेऊयात...**



संदीप दीक्षित यांनी त्यांना थेट विचारले, “तुम्ही काँग्रेसमध्ये कशासाठी आहात?” काँग्रेस ज्या धोरणांना मूलतः विरोध करते, त्याच धोरणांचे कौतुक केल्याबद्दल त्यांनी थरूर यांना ढोंगी म्हटले. दीक्षित म्हणाले,“शशी थरूर यांची समस्या ही आहे की, मला वाटत नाही त्यांना देशाबद्दल फारशी माहिती आहे. तुमच्या मते, जर कोणी काँग्रेसच्या धोरणांविरुद्ध जाऊन देशासाठी चांगले काम करीत असेल, तर तुम्ही त्या धोरणांचे अनुसरण केले पाहिजे. तुम्ही काँग्रेसमध्ये कशासाठी आहात? केवळ तुम्ही खासदार आहात म्हणून का?”ते पुढे म्हणाले, “तुम्हाला खरोखरच वाटत असेल की, भाजपा किंवा पंतप्रधान मोदींच्या रणनीती तुम्ही ज्या पक्षात आहात, त्यापेक्षा चांगल्या प्रकारे काम करीत आहेत, तर तुम्ही याचे स्पष्टीकरण दिले पाहिजे. जर तुम्ही ते देत नसाल, तर तुम्ही ढोंगी आहात.” यापूर्वी काँग्रेस नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनीही पंतप्रधानांच्या भाषणाचे कौतुक करण्याच्या थरूर यांच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. “कौतुक करण्यासारखे काहीही नाही,” असे त्या म्हणाल्या होत्या.श्रीनेत म्हणाल्या, “निष्पक्ष पत्रकारितेबद्दल त्यांची (थरूर यांची) काय अडचण आहे, हे त्यांनी आम्हाला सांगितले पाहिजे. मला त्यांचे कौतुक करण्याचे कोणतेही कारण दिसले नाही.” त्यांनी पुढे म्हटले की, शशी थरूर यांना कौतुक करण्याचे कोणते कारण सापडले हे मला समजले नाही. मुख्य म्हणजे मोदींनी त्यांच्या भाषणात काँग्रेसवर वारंवार टीका केली होतीया आठवड्याच्या सुरुवातीला शशी थरूर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या एका व्याख्यानावर आपले मत व्यक्त केले आणि एक्सवर त्याचे एक संक्षिप्त विश्लेषण पोस्ट केले. त्यांनी भाषणाच्या काही पैलूंवर टीका केली असली तरी त्यांनी काही भागांचे कौतुकही केले. हे भाषण आर्थिक दृष्टिकोन आणि सांस्कृतिक कृती अशा दोन्ही गोष्टी साधणारे होते, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, “पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्यांच्यावर नेहमी ‘निवडणूक मोड’मध्ये असल्याचा आरोप केला जातो; परंतु ते लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी खऱ्या अर्थाने ‘भावनात्मक मोड’मध्ये असतात.”थरूर यांच्या मते, मोदींनी भारताचा वारसा, भाषा आणि ज्ञान प्रणालींचा अभिमान पुनरुज्जीवित करण्यासाठी दशकभर चालणाऱ्या राष्ट्रीय मिशनचे आवाहन केले. थरूर म्हणाले, “रामनाथ गोयंका यांनी भारतीय राष्ट्रवादासाठी आवाज उठविण्याकरिता इंग्रजीचा कसा वापर केला होता, याचा उल्लेखही त्यांनी करायला हवा होता!”बिहार निवडणुकीत महाआघाडीला केवळ ३८ जागा मिळाल्या. या निकालावर शशी थरूर यांनी आपले मत व्यक्त केले. त्यावेळी थरूर यांनी, “मला खात्री आहे की, पक्षाची (काँग्रेस) ही जबाबदारी आहे की, त्यांनी या कारणांचा सखोल अभ्यास करावा. पण लक्षात ठेवा, राष्ट्रीय जनता दलाने (आरजेडी) सर्वाधिक जागा लढवल्या होत्या. त्यामुळे त्यांनीदेखील त्यांच्या स्वतःच्या कामगिरीचे काळजीपूर्वक परीक्षण करणे आवश्यक आहे. पण मी एवढे नक्कीच सांगेन की, अशा विषयावर आपल्या एकूण कामगिरीकडे पाहणे खूप महत्त्वाचे आहे,” असे म्हटले होते.

### भारतासाठी अनमोल व्यक्ती

शशी थरूर यांनी ‘द हिंदू’ या इंग्रजी दैनिकातील एका लेखात पंतप्रधानांचे कौतुक केले होते. थरूर यांनी ‘द हिंदू’ या इंग्रजी दैनिकासाठी लिहिलेल्या लेखात म्हटले होते, “ऑपरेशन सिंदूरनंतरचा राजनैतिक संपर्क हा राष्ट्रीय संकल्प आणि प्रभावी संवादाचा एक मार्ग होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ऊर्जा, त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि संवाद साधण्याचे कौशल्य यामुळे ते जागतिक स्तरावर भारतासाठी अनमोल व्यक्ती आहेत; परंतु त्यांना अधिक पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे.”

# बुद्धिजीवी लोक दहशतवादी बनतात तेव्हा

## दिल्ली पोलिसांचा उमर खालिद, शरजील इमामच्या जामिनास विरोध

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**२०२० च्या दिल्ली दंगलीतील आरोपी उमर खालिद, शरजील इमाम आणि इतरांच्या जामीन अर्जांना विरोध करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणाशी संबंधित व्हाईट-कॉलर दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केल्याचा संदर्भ दिला. दिल्ली पोलिसांच्या वतीने बाजू मांडणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू म्हणाले की, एक ट्रेंड उदयास आला आहे.**

आरोपींच्या जामीन अर्जांना विरोध करताना, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू म्हणाले की, जेव्हा बुद्धिजीवी लोक दहशतवादी बनतात तेव्हा ते प्रत्यक्ष दहशतवाद्यांपेक्षा अधिक धोकादायक ठरतात. “बुद्धिजीवी लोक सरकारी पैशांवर डॉक्टर होतात आणि नंतर वाईट कृत्ये करतात. ते खूप धोकादायक असतात”, असे ते म्हणाले.सुरक्षा यंत्रणांनी नुकतेच हरियाणातील अल-फलाह विद्यापीठातून कार्यरत असलेले जैश-ए-मोहम्मद समर्थित व्हाईट-कॉलर दहशतवादी मॉड्यूल उघडकीस आणले आहे. या महिन्याच्या सुरुवातीला एका डॉक्टरच्या निवासस्थानाच्या



परिसरातून सुमारे २,९०० किलो आयईडी बनवण्याचे साहित्य जप्त करण्यात आले होते. हे साहित्य जप्त केल्यानंतर केवळ एका दिवसातच त्याचा साथीदार डॉ. उमर नबी याने दिल्लीतील लाल किल्ल्याबाहेर कारमध्ये आत्मघातकी स्फोट घडवून आणला होता, ज्यामध्ये १४ जणांचा मृत्यू झाला होता. तेव्हापासून तपास यंत्रणांनी या प्रकरणाशी संबंधित अनेक डॉक्टरांना अटक करून ताब्यात घेतले आहे.

### दहशतवादी मॉड्यूल उघडकीस

जेव्हा बुद्धिजीवी लोक दहशतवादी बनतात तेव्हा ते प्रत्यक्ष दहशतवाद्यांपेक्षा अधिक धोकादायक ठरतात. “बुद्धिजीवी लोक सरकारी पैशांवर डॉक्टर होतात आणि नंतर वाईट कृत्ये करतात. ते खूप धोकादायक असतात”, असे ते म्हणाले.सुरक्षा यंत्रणांनी नुकतेच हरियाणातील अल-फलाह विद्यापीठातून कार्यरत असलेले जैश-ए-मोहम्मद समर्थित व्हाईट-कॉलर दहशतवादी मॉड्यूल उघडकीस आणले.


शरजील इमाम, उमर खालिद आणि इतर तिघांच्या जामीन अर्जावरील सुनावणी सुरू असताना दिल्ली पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात हा मुद्दा उपस्थित केला.फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा कायद्यावरून ईशान्य दिल्लीत झालेल्या जातीय दंगलींना कारणीभूत ठरलेल्या मोठ्या कटात सहभागी असल्याचा आरोप करत शरजील इमाम आणि उमर खालिद यांच्यावर यूएपीए या कठोर दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यावेळी दिल्लीत झालेल्या हिंसाचारात ५० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले होते आणि ७०० हून अधिक लोक जखमी झाले होते.

# अरिजीत सिंहने गायलं 'जीव रंगला' गाणं, व्हिडीओ झाला व्हायरल

संगीत विश्वातील सध्याचं आघाडीचं नाव म्हणजे अरिजीत सिंह. अरिजीतने आपल्या सुमधूर आवाजाने तरुणाईला अक्षरशः वेड लावलं आहे. त्यामुळेच अरिजीतचा मोठा चाहता वर्ग आहे. त्याचं कुठलंही गाणं असो ते सुपरहिट होतंच. अरिजीत त्याच्या गाण्यांव्यतिरिक्त लाइव्ह कॉन्सर्टमुळे खूप चर्चेत असतो.

त्याच्या लाइव्ह कॉन्सर्टला चाहते तुफान गर्दी करतात. नुकताच पुण्यातील एमसीए इंटरनॅशनल स्टेडियममध्ये अरिजीत सिंहचा लाइव्ह कॉन्सर्ट पार पडला. या कॉन्सर्टमधील सध्या अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे पुण्यातील कॉन्सर्टमध्ये अरिजीत सिंहने मराठी गाणं गायलं; ज्याचा व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे.

या व्हिडीओमध्ये अरिजीत सिंह मराठी गाणं गाताना दिसत आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेता 'जोगवा' चित्रपटातील 'जीव रंगला' ( JEEV RANGLA ) गाणं अरिजीत सिंहने गाताना पाहायला मिळत आहे. अरिजीतच्या




गोड आवाजात 'जीव रंगला' गाणं ऐकून अनेकांच्या अंगावर शहारे आले, अशा प्रतिक्रिया उमटल्या आहेत.अरिजीत सिंहचा हा व्हिडीओ १.८ मिलियनहून अधिक जणांनी पाहिला आहे.

या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियांचा पाऊस पडला आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "म्हणून अरिजीत सिंह खूप उत्कृष्ट गायक आहे." दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "मराठी गाणं खूप छान गातो. गहिवरून आलं." तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "काय आवाज आहे आणि जबरदस्त." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं की, मराठी गाणं गाऊन लोकांची मनं जिंकली. दरम्यान, याआधीही अरिजीत सिंहने लाइव्ह कॉन्सर्टमध्ये मराठी गाणी गायली होती. तेव्हादेखील त्याने आपल्या गोड आवाजाने चाहत्यांची मनं जिंकली होती. अरिजीत सिंह जसा सध्या मराठी गाणं गायल्यामुळे चर्चेत आला आहे. तसाच सध्या दुसऱ्या बाजूला पंजाबी प्रसिद्ध गायक हनी सिंगदेखील चर्चेत आला आहे.

## गौरी स्प्रॅट आमिरच्या प्रेमात का पडली?

बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आमिर खान(AAMIR KHAN) हा सध्या चांगलाच चर्चेत आहे. नुकताच त्याने त्याचा ६० वा वाढदिवस साजरा केला. यादरम्यानच त्याने त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबत मोठा खुलासा केला. ६० वर्षीय अभिनेता रिलेशनशिपमध्ये आहे. तो दीड वर्षांपासून नात्यात असल्याचे त्याने म्हटले. तसेच ज्या मुलीला तो डेट करत आहे, तिची ओळखही करून दिली. गौरी असे तिचे नाव असून ते एकमेकांना गेल्या २५ वर्षांपासून ओळखत असल्याचे आमिर खानने स्पष्ट केले. गौरी स्प्रॅट ही मूळची बंगळूरूमधील असून सध्या ती आमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करत आहे. आता आमिर खानची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटने मीडियाशी संवाद साधला. त्यावेळी तिने ती आमिर खानच्या का प्रेमात पडली, तिने आतापर्यंत आमिर खानचे किती सिनेमे पाहिले आहेत, यावर भाष्य केले. गौरीने आमिर खानचे किती चित्रपट पाहिले आहेत यावर बोलताना म्हटले की, 'लगान' व 'दिल चाहता है' हे दोनच सिनेमे मी पाहिले आहेत. पुढे गौरी आमिर खानबरोबरच्या रिलेशनशिपविषयी बोलताना म्हणाली, "प्रेमळ, काळजी घेणारा जेंटलमन पार्टनर किंवा जोडीदार मला हवा होता" गौरीने असे म्हणताच आमिर खानने तिला विचारले की, "त्यानंतर तू मला शोधलेस का?"

## 'हायवे'साठी आलियाने आधी दिला नकार

सध्याच्या काही आघाडीच्या बॉलीवूड अभिनेत्रींच्या यादीत आवर्जून येणारे नाव म्हणजे आलिया भट्ट (ALIA BHATT). आलियाने तिच्या आजवरच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यापैकीच एक चित्रपट म्हणजे 'हायवे' (HIGHWAY). 'हायवे' हा चित्रपट आलिया भट्टच्या उत्तम चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात वीरा त्रिपाठीच्या भूमिकेसाठी तिचं खूप कौतुक झालं होतं. या चित्रपटामुळेच ती केवळ उत्तम अभिनेत्री आहे हे सिद्ध झाले. पण, 'हायवे' हा चित्रपट करण्यास आलिया सुरुवातीला घाबरली होती? मग नंतर एका व्यक्तीमुळे तिनं यात काम करण्यास होकार दिला. चित्रपटाचे दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी याबद्दल नुकतंच वक्तव्य केलं. 'गेम चेंजर्स'साठी कोमल नाहटा यांच्याशी झालेल्या संभाषणात इम्तियाज अली यांनी सांगितलं की, 'हायवे'साठी ते आधी अनुभवी अभिनेत्रीची निवड करण्याचा विचार करीत होते. या भूमिकेसाठी त्यांना तिशीच्या आसपास वय असलेल्या अभिनेत्रीची आवश्यकता आहे. पण १८ वर्षांच्या आलिया भट्टला भेटल्यानंतर त्यांना ती या भूमिकेसाठी परिपूर्ण असल्याचं जाणवलं. इम्तियाज अली यांनी सांगितले, "आलिया तेव्हा १८ वर्षांची असली तरीही तिच्यात पात्राला आवश्यक असलेली भावनिक खोली होती. तिनं तेव्हा जास्त काम केलं नव्हतं आणि मी तिचा 'स्टुडंट ऑफ द इयर' चित्रपटही पाहिला नव्हता; पण ती ज्या पद्धतीनं बोलली, ते खूप आकर्षक होतं. तिच्यात एक गुण होता, जो या चित्रपटासाठी उत्कृष्ट होता. तिच्या याच गुणानं मला खात्री पटवून दिली की, ती या भूमिकेसाठी योग्य आहे."इम्तियाज अली यांनी पुढे सांगितलं की, "महेश भट्ट यांनी 'हायवे' चित्रपटात काम करण्यास आलियाला तयार करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली होती. मी तिच्या घरी जायचो आणि भट्टसाहेब तिला हे काम करण्यासाठी पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. सुरुवातीला ती थोडी घाबरली होती, तिला शंका होती की, ती हे काम करू शकेल की नाही. कारण- हा चित्रपट सोपा नव्हता. पण नंतर तिनं होकार दिलाच."दरम्यान, आलिया भट्टच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं तर, तिचा आगामी चित्रपट 'अल्फा' आहे.



## सलमानच्या फार्महाऊसवर घालवलेले 3 दिवस

कन्नड अभिनेता किच्चा सुदीपची मुलगी सान्वीने 'दबंग ३' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानच्या भाईजानबरोबरच्या आठवणी सांगितल्या आहे. किच्चा सुदीपने 'दबंग ३'मध्ये खलनायकाची भूमिका केली होती. सिनेमाचं शूटिंग सुरू होतं तेव्हा सान्वी १५ वर्षांची होती. ती सलमानची खूप मोठी चाहती होती, त्यामुळे तिच्या वडिलांबरोबर शूटिंगला आली होती. सलमानबद्दल गैरसमज आहेत, तो खूप चांगला आहे, असं सान्वी म्हणाली. 'दबंग ३' सिनेमा २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगसाठी वडिलांबरोबर मुंबईत आलेल्या सान्वीचे सलमान खानने खूप लाड केले होते.जिनल मोदीला दिलेल्या एका मुलाखतीत बोलताना २१ वर्षीय सान्वीने सिनेमाच्या शूटिंग्च्या आठवणी सांगितल्या. "जेव्हा पप्पा 'दबंग ३' चित्रपटाचे शूटिंग करत होते, ते माझ्या आयुष्यातील सर्वात मजेदार दिवस होते. मी लहानपणी सलमान खान यांच्यासाठी एक ब्रेसलेट बनवले होते आणि त्यांनी ते बिग बॉसमध्येही घातले होते. त्यामुळे 'दबंग ३' दरम्यान भेटल्यावर ती आठवण ताजी झाली," असं सान्वी म्हणाली.सान्वीने सांगितलं की शूटिंगनंतर तिचे वडील तिला मुंबईला घेऊन गेले आणि ते सलमानच्या घरी जेवायला गेले. सलमानच्या घरी जाणं हे सान्वीला तिच्या वडिलांनी दिलेलं सरप्राइज होतं. "मी त्यांना पाहिलं आणि मी विचार करत होते की अरे देवा, हे तर सलमान सर आहेत. त्या दिवशी त्यांनी माझे खूप लाड केले. त्यांनी मला गाणं गाण्यास सांगितलं. मग मी त्यांच्यासाठी गाणं गायलं," असं सान्वी म्हणाली.त्यांनी पहाटे ३ वाजता एका संगीत दिग्दर्शकाला फोन केला आणि मी हिला तुझ्याकडे पाठवत आहे असं सांगितलं. ते म्हणाले की हिचा आवाज रेकॉर्ड करून ठेव, जर एखाद्या कामासाठी आपल्याला तिच्या आवाजाची गरज भासली तर आपण वापरू. नंतर दुसऱ्या दिवशी मी त्या संगीत दिग्दर्शकाकडे गेले.



## दीपिका पादुकोणच्या 'त्या' लूकने वेधले लक्ष

बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE)ची ओळख आहे. दीपिका पादुकोणने २००७ साली 'ओम शांती ओम' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. शाहरुख खानबरोबरचा हा चित्रपट चांगलाच गाजल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटाचे दिग्दर्शन फराह खानने केले होते. त्याआधी अभिनेत्रीने २००६ साली कन्नड चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. 'ऐश्वर्या' असे या चित्रपटाचे नाव होते. अभिनेत्रीने 'यह जवानी है दिवानी', 'चेन्नई एक्स्प्रेस', 'कॉकटेल', 'हॅपी न्यू इयर', 'खेलें हम जी जान से', 'देसी बॉइज', 'लव्ह आज कल' ते 'ब्रह्मास्त्र', 'जवान', 'पठाण', 'सिंघम अगेन', 'फायटर' अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांत अभिनेत्री प्रमुख भूमिकेत दिसली होती. तर, दीपिकाचा पती व अभिनेता रणवीर सिंग हादेखील चर्चेत असणारा अभिनेता आहे. 'लुटेरा', 'राम लीला', 'बाजीराव मस्तानी', 'बेफिकरे', 'गुंडे', 'दिल धडकने दो', 'पद्मावत', 'सिम्बा', 'गली बॉय', 'सिंघम अगेन', अशा चित्रपटांसाठी तो ओळखला जातो. रणवीर सिंह त्याच्या उत्साहाने नेहमीच सर्वांचे लक्ष वेधून घेतो. तसेच त्यांची अतरंगी कपड्यांची स्टाईल प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत असतात. आता सोशल मीडियावर या सेलिब्रिटी जोडप्याचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे.

दिग्गजांच्या यादीत मिळवलं स्थान

## रहीमने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली

# मुशफिकुर रहीमचा वर्ल्ड रेकॉर्ड!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेशचा अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज मुशफिकुर रहीम आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०० वा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. आयर्लंडविरूद्ध सुरू असलेल्या सामन्यात त्याने दमदार शतकी खेळी केली आहे. आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०० व्या सामन्यात शतकी खेळी करताच मुशफिकुर रहीमच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने शतक झळकावताच असं काही करून दाखवलं आहे, जे विराट कोहली, सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या दिग्गजांनाही जमलेलं नाही.**

## बांगलादेशचा प्रथम फलंदाजीचा निर्णय



कसोटी क्रिकेटमध्ये १०० कसोटी सामने खेळणाऱ्या खेळाडूंची यादी बरीच मोठी आहे. पण १०० व्या कसोटी सामन्यात शतकी खेळी करण्याचा पराक्रम मोजक्याच खेळाडूंना करता आला आहे. आता मुशफिकुर रहीमने या मोजक्यात खेळाडूंच्या यादीत स्थान पटकावलं आहे. आयर्लंडविरूद्ध शतकी खेळी करताच मुशफिकुर रहीम हा कसोटी क्रिकेटमध्ये १०० व्या सामन्यात शतकी खेळी करणारा जगातील ११ वा फलंदाज ठरला आहे. इंग्लंडचे माजी फलंदाज कॉलिन काऊड्रे यांनी १९६८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळताना १०० व्या सामन्यात पहिलं शतक झळकावलं होतं. तर ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज रिकी पॉन्टिंग्च्या नावे १०० व्या कसोटी सामन्यातील दोन्ही डावात शतक झळकावण्याचा विक्रम आहे. त्याने २००६ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरूद्ध खेळताना हा पराक्रम केला होता.भारताचा माजी फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतकं झळकावण्याची नोंद आहे. सचिनने आपल्या कसोटी कारकिर्दीत २०० सामन्यांमध्ये भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केलं. पण त्याला १०० व्या आणि २०० व्या कसोटीत देखील शतक झळकावता आलं नव्हतं. पण आता मुशफिकुर रहीमने हा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १३३ षटकांचा खेळ होईपर्यंत ८ गडी बाद ४४३ धावा केल्या आहेत. बांगलादेशकडून फलंदाजी करताना मुशफिकुर रहीमने १०६ धावांची खेळी केली. तर यष्टीरक्षक फलंदाज लिटन दासने १२८ धावांची दमदार खेळी केली. बांगलादेशचा अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज मुशफिकुर रहीम आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०० वा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे.आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०० व्या सामन्यात शतकी खेळी करताच मुशफिकुर रहीमच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने शतक झळकावताच असं काही करून दाखवलं आहे, जे विराट कोहली, सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या दिग्गजांनाही जमलेलं नाही. कसोटी क्रिकेटमध्ये १०० कसोटी सामने खेळणाऱ्या खेळाडूंची यादी बरीच मोठी आहे. पण १०० व्या कसोटी सामन्यात शतकी खेळी करण्याचा पराक्रम मोजक्याच खेळाडूंना करता आला आहे. आता मुशफिकुर रहीमने या मोजक्यात खेळाडूंच्या यादीत स्थान पटकावलं आहे. आयर्लंडविरूद्ध शतकी खेळी करताच मुशफिकुर रहीम हा कसोटी क्रिकेटमध्ये १०० व्या सामन्यात शतकी खेळी करणारा जगातील ११ वा फलंदाज ठरला आहे. इंग्लंडचे माजी फलंदाज कॉलिन काऊड्रे यांनी १९६८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळताना १०० व्या सामन्यात पहिलं शतक झळकावलं होतं. तर ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज रिकी पॉन्टिंग्च्या नावे १०० व्या कसोटी सामन्यातील दोन्ही डावात शतक झळकावण्याचा विक्रम आहे. त्याने २००६ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरूद्ध खेळताना हा पराक्रम केला होता.भारताचा माजी फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतकं झळकावण्याची नोंद आहे. सचिनने आपल्या कसोटी कारकिर्दीत २०० सामन्यांमध्ये भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केलं. पण त्याला १०० व्या आणि २०० व्या कसोटीत देखील शतक झळकावता आलं नव्हतं.

### रहीमने १०६ धावांची खेळी केली

पण आता मुशफिकुर रहीमने हा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १३३ षटकांचा खेळ होईपर्यंत ८ गडी बाद ४४३ धावा केल्या आहेत. बांगलादेशकडून फलंदाजी करताना मुशफिकुर रहीमने १०६ धावांची खेळी केली. तर यष्टीरक्षक फलंदाज लिटन दासने १२८ धावांची दमदार खेळी केली.


# वर्ल्ड कप सत्य साई बाबांमुळे जिंकू शकलो


## सचिन तेंडुलकरने वर्ल्ड कपबाबत आठवणींना उजाळा दिला

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवंगत आध्यात्मिक गुरु श्री सत्य साई बाबा यांच्या जन्म शताब्दी सोहळ्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. यावेळी माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने बाबांशी जोडल्या गेलेल्या आठवणींना उजाळा दिला. २०११ च्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषकाच्या विजेत्या संघात सचिन तेंडुलकरचाही समावेश होता.**





या विश्वचषकाच्या आठवणी सांगताना सचिन तेंडुलकर म्हणाला की, २०११ च्या विश्वचषकादरम्यान बाबांनी मला पुस्तक भेट दिले होते. या पुस्तकामुळे मला प्रेरणा मिळाली. सचिन तेंडुलकरच्या भाषणाचा व्हिडीओ एएनआय वृत्तसंस्थेने एक्सवर पोस्ट केला आहे. ज्यात सचिन म्हणतो, "मी अनेक वर्ल्ड कप खेळल्यानंतर २०११ चा वर्ल्ड कप माझा शेवटचा चषक असेल, याची मला खात्री होती. बंगळुरूमध्ये सराव करत असताना मला फोन आला की, श्री सत्य साई बाबांनी त्यांचे पुस्तक मला भेट म्हणून पाठवले आहे.

### आशीर्वादामुळेच हे शक्य होऊ शकले

जिथे सर्व भारतीय एकत्र आनंद व्यक्त करत होते. आमचे हितचिंतक आणि आमच्या गुरूंनी दिलेल्या आशीर्वादामुळेच हे शक्य होऊ शकले", असेही सचिनने सांगितले.जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी, बॉलिवूडची अभिनेत्री ऐश्वर्या राय, केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू, जी किशन रेड्डी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यामुळे माझ्या चेहऱ्यावर आनंद उमटला."श्री सत्य साई बाबांच्या या कृतीमुळे माझ्यात आत्मविश्वास संचारला होता. मला कळून चुकले की, हा वर्ल्ड कप आमच्यासाठी विशेष होणार आहे. या पुस्तकामुळे माझ्यात वेगळाच आत्मविश्वास जागृत झाला होता. आतून एक उत्साह सळसळत होता. यानंतर हे पुस्तक माझ्यासाठी खूप महत्त्वाचे बनले."२०११ च्या वर्ल्ड कप दरम्यान काय झाले हे सर्वांनाच माहीत आहे. मुंबईत श्रीलंकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात आम्ही चषक उचलला आणि यानंतर संबंध देशाने जल्लोष साजरा केला. माझ्या क्रिकेट कारकिर्दीतील हा सुवर्ण क्षण होता.

स्मार्ट PCMC
SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

| शुक्रवार|
| दि. 21 नोव्हेंबर 2025|

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

**PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE**
MOSHI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
43 Years of Excellence in Education

**EMPOWERING YOUNG MINDS**
TO CREATE A **STRONGER TOMORROW.**

**ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27**
Grade Nursery to Grade XII



**WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?**

- 43 Years of Excellence in Education
- Advanced Robotics & Computer Labs
- Experienced and Dedicated Faculty
- Multiple Sports Grounds for All-Round Development
- Proven 100% Results in Grade X
- A Perfect Blend of Tradition and Innovation

**ENROLL NOW**

**OFFICE HOURS:**
MONDAY TO SATURDAY, 8 AM – 5 PM

**+91 9890613333 | +91 9373073077**
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार।

। दि. 21 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### "महाईन्यूज"च्या वृत्ताचा परिणाम

# अखेर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल नरमले!

## राजकीय सारवासारव : माजी आमदार विलास लांडे यांना शुभेच्छांची थेट 'प्रेसनोट' काढली!

। पिंपरी चिंचवड ।
विशेष प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) शहराध्यक्ष योगेश बहल यांनी अखेर माजी आमदार विलास लांडे यांच्या नियुक्तीबाबत अधिकृत प्रेसनोट काढली आणि शुभेच्छाही दिल्या आहेत. त्यामुळे शहराध्यक्ष बहल अखेर नरमले असून, राजकीय सारवासारव करीत आहेत, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**





विधानसभा निवडणूक-2024 मध्ये तत्कालीन शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. त्यामुळे अजित पवार यांनी शहराध्यक्षपदी योगेश बहल यांची नियुक्ती केली होती. नंतरच्या काळात गव्हाणे पुन्हा अजित पवार गटात प्रवेशकर्ते झाले.

दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला स्थानिक पातळीवर प्रभावी चेहरा हवा... अशा प्रकारचे वृत्तांकन 'महाईन्यूज'ने केले होते. त्याची प्रदेश पातळीवर दखल घेण्यात आली आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक प्रचार प्रमुखपदी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची, तर जिल्हा निवडणूक समन्वयकपदी माजी आमदार विलास लांडे यांची नियुक्ती करण्यात आली.

तत्पूर्वी, दि. 10 नोव्हेंबर 2025 रोजी योगेश बहल यांनी शहराची कार्यकारिणी जाहीर केली होती. या कार्यकारिणीत माजी आमदार विलास लांडे यांचा उल्लेख 'मुख्य समन्वयक' आणि नाना काटे यांचा उल्लेख 'मुख्य संघटक' असा होता. सदर पत्रकार परिषदेला लांडे उपस्थित राहीले नाहीत. "शहराचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेले नेते बहल यांच्या हाताखाली काम करणार आहेत का?" असा गंभीर संदेश यानिमित्ताने राष्ट्रवादीच्या सामान्य कार्यकर्त्यांमध्ये गेला. याबाबतही 'महाईन्यूज'ने सडेतोड वृत्तांकन केले. त्याची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली.

परिणामी, नाना काटे आणि विलास लांडे यांना निवडणुकीच्या निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका देण्यात आली. दि.16 नोव्हेंबर 2025 रोजी ही नियुक्ती झाली. मात्र, योगेश बहल यांनी साधी अभिनंदनाची पोस्टही केली नाही. शहरातील राजकीय घडामोडींवर 'बारिक लक्ष' असलेल्या 'महाईन्यूज' पुन्हा दणका दिला. "योगेश बहल यांना भूमिपुत्रांबाबत "आकस" भावना..." अशा मथळ्याने धडाकेबाज वृत्त प्रसिद्ध झाले. दि. 18 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी वृत्त प्रसिद्ध झाले आणि त्याची दखल घेत सायंकाळी बहल यांनी माजी आमदार विलास लांडे यांच्या नियुक्तीबाबत आणि शुभेच्छांबाबत अधिकृत 'प्रेसनोट' काढली.

### राष्ट्रवादीसमोर गळती रोखण्याचे आव्हान...

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने राष्ट्रवादीतील काही बडे मासे गळाला लावले आहेत. गत निवडणुकीत 35 नगरसेवक संख्याबळ असलेल्या राष्ट्रवादीतून अनेकजण यावेळी भाजपातून चाचपणी करीत आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकांचा निकाल दि. 3 डिसेंबर रोजी होईल. त्यानंतर पहिल्या टप्प्यात शहरातील भाजपा प्रवेशाचा जाहीर कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीला धक्का देण्याचे नियोजन भाजपा नेत्यांनी केले आहे. त्यामुळे मुख्य समन्वयक विलास लांडे आणि प्रचार प्रमुख नाना काटे यांना संभाव्य गळती रोखण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. दुसरीकडे, भाजपामध्ये ज्यांना संधी मिळणार नाही, त्यांना गळ


---

# खड्डे शोधण्यासाठी संपूर्ण शहराचे 'जीआयएस' द्वारे सर्वेक्षण

## महापालिका शोधणार स्वयंचलित वाहनाने खड्डे; खराब रस्त्यांचा देणार अहवाल

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून स्वयंचलित वाहनाने रस्त्यावर पडलेले खड्डे, खराब रस्ते आणि तुटलेल्या पदपथाचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. पावसाळा संपूनही शहराच्या विविध भागांत साडेतीनशेहून अधिक खड्डे असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महापालिकेकडून हे सर्वेक्षण महिनाभरात पूर्ण केले जाणार आहे.**



त्यानंतरॉ खराब रस्ते, खड्डे व पदपथ दुरुस्तीसाठी स्वतंत्र आर्थिक नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना शहर खड्डेमुक्त होण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. रस्त्यांच्या स्थितीचे मूल्यांकन हे खड्डे असलेले परिसर ओळखण्यास आणि रस्त्यांच्या आवश्यक दुरुस्तीला प्राधान्य देण्यास उपयुक्त ठरणार आहे. महापालिकेकडून स्वयंचलित वाहनाने रस्त्यावरील खड्ड्यांचा शोध घेत दुरुस्ती केली जाणार आहे. त्यासाठी महापालिकेने जीआयएस या प्रणालीचा आधार घेतला आहे. हे काम सलग तीन वर्षे सुरू राहणार आहे. शहरात सुमारे १ हजार ७०० किलोमीटर लांबीचे काँक्रीट व डांबरी रस्ते आहेत. या रस्त्यांची प्रत्यक्ष तपासणी, संरचनात्मक मूल्यांकन द्वारे (स्ट्रक्चरल असेसमेंट) खड्डे दुरुस्ती कामांच्या गुणवत्ता वाढीला प्राधान्य दिले. जाणार आहे. खराब रस्ते, खड्डे व पदपथ दुरुस्तीसाठी आर्थिक नियोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर रस्ते दुरुस्ती आणि सुधारणा करणे, महापालिकेच्या अंदाजपत्रकाचे नियोजन करण्यासाठी नोव्हेंबर २०२५ मध्ये पहिला अहवाल सादर करण्यात येईल.

> "सर्वेक्षणातून सर्व समस्यांची नोंद केली जाईल. वार्षिक देखभाल अहवाल तयार करण्यासाठी तसेच खड्डे दुरुस्तीच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी जीआयएस आधारित ॲपही विकसित केले आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी सततची होणारी रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे टाळता येणार आहेत.
>
> **-मकरंद निकम,** शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.

## मिशन–PCMC : महापालिका निवडणुकीसाठी


# शरद पवार गटाची ‘कोअर कमिटी’ जाहीर!

### खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या नेतृत्त्वात पिंपरी–चिंचवडमध्ये रणनिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार गटाने शहरातील संघटन अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण मा. खा. शरदचंद्र पवार आणि प्रदेशाध्यक्ष मा. आ. शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुधारित ‘कोअर कमिटी’ जाहीर करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मागणीचा आदर राखत ही रचना निश्चित करण्यात आली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार
महाराष्ट्र प्रदेश

रविंद्र पवार
सरचिटणीस

जा. क्र. 273 /पी.एस./एन.सी.पी./ नोव्हेंबर २०२५

दि.२०/११/२०२५

सुधारित कोअर कमिटी

महोदय,

पिंपरी चिंचवड शहराची आगामी महानगरपालिका निवडणूक लक्षात घेऊन पक्षाचे संघटन बळकट व्हावे व निवडणुकीला सामोरे जाताना सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी एकत्रित काम करावे यासाठी **पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण मा. खा. श्री. शरदचंद्र पवार** यांनी यापूर्वीच बैठका घेतलेल्या आहेत.

**प्रदेश अध्यक्ष मा. आ. श्री. शशिकांत शिंदे** यांनीही सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. शहरातील बहुतांश नेत्यांनी मागणी केल्यानुसार मा. प्रदेश अध्यक्षांच्या मान्यतेने खाली नमूद केल्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीकरिता “ कोअर कमिटी ” स्थापन करण्यात येत आहे.

१) मा. खा. डॉ. अमोल कोल्हे, खासदार
२) मा. हर्षवर्धन पाटील, प्रभारी
३) मा. आ. रोहितदादा पवार, आमदार व प्रदेश सरचिटणीस
४) मा. आझमभाई पानसरे, माजी महापौर
५) मा. प्रकाश म्हस्के, निरिक्षक
६) मा. तुषार कामते, पिंपरी चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष
७) मा. देवेंद्र तायडे, पिंपरी चिंचवड शहर कार्याध्यक्ष
८) सौ. सुलक्षणा शिलवंत, विधानसभा उमेदवार

महापालिका निवडणूक लक्षात घेऊन सर्व पदाधिकारी–कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यासाठी ही कमिटी मार्गदर्शक भूमिका निभावणार आहे.

**जाहीर करण्यात आलेल्या कोअर कमिटीतील सदस्य**

१) डॉ. अमोल कोल्हे – खासदार
२) हर्षवर्धन पाटील – प्रभारी
३) आ. रोहितदादा पवार – आमदार व प्रदेश सरचिटणीस
४) आझम पानसरे – माजी महापौर
५) प्रकाश म्हस्के – निरीक्षक
६) तुषार कामठे– जिल्हाध्यक्ष, पिंपरी चिंचवड
७) देवेंद्र तायडे – कार्याध्यक्ष
८) सुलक्षणा शिलवंत – विधानसभा उमेदवार
९) रविकांत वरपे – प्रदेश प्रवक्ता
१०) संदीप चव्हाण – प्रदेश संघटक सचिव
११) विक्रांत पाटील – प्रदेश संघटक सचिव
१२) सुनिल गव्हाणे – विद्यार्थी प्रदेश अध्यक्ष
१३) ज्योती निंबाळकर – महिला शहर अध्यक्षा
१४) इम्रान शेख – युवक शहर अध्यक्ष
१५) काशिनाथ जगताप – शहर उपाध्यक्ष
१६) विशाल वाकडकर – युवक प्रदेश उपाध्यक्ष
१७) जयंत शिंदे – शहर सरचिटणीस

प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार यांच्या पत्रानुसार, या कोअर कमिटीच्या मार्गदर्शनाखाली येथील संघटनात्मक कामकाज अधिक वेगवान व समन्वयपूर्ण होणार असून नियमित अहवाल प्रदेश कार्यालयास पाठविण्यात येणार आहे.



## मिशन–PCMC : प्रभागातील नागरिकांना भावनिक आवाहन

# सत्तेवर नाही तर सेवेवर माझा विश्वास : अनुराधा साळुंके

## प्रभाग–3 चऱ्होली–मोशी–डुडूळगावमधून निवडणुकीच्या रिंगणात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. सर्वसामान्य कुटुंबातून सर्वसामान्य लोकांसाठी काम करण्याची इच्छा असलेले सामान्य कुटुंबातील इच्छुकही पुढे येत आहेत.**



### अनुराधा साळुंखे यांनी केले आवाहन...

नमस्कार,

मी अनुराधा दिपक साळुंके... प्रभाग क्रमांक ३ , चऱ्होली, मोशी, डुडूळगाव, गंधर्व नगरी, साई मंदिर, व संत ज्ञानेश्वर नगर भोसरी येथून, अनुसूचित जाती प्रवर्गातून इच्छुक आहे."

मी आयुष्यभर समाजातच वाढले... समाजासाठीच झटले. माहेरी आणि सासरी परिस्थिति हलाखीची होती. स्वतःचं घर नव्हतं. पण कष्टानं, संघर्षानं आयुष्य उभं केलं. म्हणूनच मी प्रत्येक महिलेला उभं राहिलेलं पाहू इच्छिते.

माझे पती दिपक साळुंके यांना लहान पनापासून सामाजिक कामाची आवड आहे. त्यांच्या च पावलावर पाऊल ठेवत मी काम करत आहे. खुशी चॅरिटेबर ट्रस्ट च्या माध्यमातून आम्ही ८९ अनाथ मुलांचं संगोपन, वृद्धाश्रम सेवा, ऊसतोड, पूरपरिस्थिती मुळे अडचणीत आलेल्या कुटुंबांना, मजुरांच्या मुलांना आधार अशी कितीतरी कामे केली आहेत. कर्तव्य भावनेने सामाजिक काम करत आहोत. तरुणी व तरुणांना नोकरी शोधणारे नव्हे, नोकरी निर्माण करणारे बनवणं ही माझी भूमिका आहे.

चऱ्होली, मोशी, डुडूळगाव, गंधर्व नगरी, साई मंदिर, व संत ज्ञानेश्वर नगर भोसरी परिसरातील जनतेची साथ मिळाल्यास प्रभागाचा चेहरा बदलण्याचा निर्धार आहे. मी राजकारणात येत नाही, मी समाजाच्या वेदना घेऊन येते आहे. माझा प्रभाग, माझी जबाबदारी – हीच माझी खरी ओळख आहे. सत्तेवर नाही तर सेवेवर माझा विश्वास आहे. कारण सेवा हीच माझी ओळख आणि शक्ती आहे.

चऱ्होली प्रभाग- ३ मधून कष्टकरी-वंचित लोकांसाठी आणि महिला सक्षमीकरणासाठी सकारात्मक दृष्टीने काम करणाऱ्या अनुराधा साळुंके यांनीसुद्धा निवडणूक लढण्याचा संकल्प केला आहे.

या निमित्ताने प्रभागातील नागरिकांना त्यांनी भावनिक आवाहन केले आहे.

---

# विश्वविक्रमी ‘रिव्हर सायक्लोथॉन’ यंदा मोशीत!

## छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या मैदानावर सायकलपटूंचा मेळा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरात होणाऱ्या ‘पिंपरी-चिंचवड रिव्हर सायक्लोथॉन’ या भव्य उपक्रमासाठी शहर सज्ज झाले आहे. यंदाच्या सायक्लोथॉनमध्ये तब्बल 35 हजाराहून अधिक सायकलस्वार सहभागी होणार असून, उपक्रमासाठी प्रथमच नव्या, सुसज्ज ठिकाणी जागानिश्चिती केली आहे. ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, बोऱ्हाडेवाडी, मोशी या प्रशस्त ठिकाणी विश्वविक्रमी रिव्हर सायक्लोथॉन होणार आहे.**




### उत्साह तोच..ठिकाण नवे :

### आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश

इंद्रायणी नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी “रिव्हर सायक्लोथॉन” चे आयोजन करण्यात येते. भोसरी येथील गावजत्रा मैदानावर होणारी सायक्लोथॉन यावर्षी नागरिकांचा प्रतिसाद आणि संभाव्य गर्दी याचा विचार करुन मोशी येथील प्रशस्त जागेत घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे-नाशिक महामार्गालगत असलेले हे स्थळ मोठ्या प्रमाणावरील गर्दीला सहज सामावून घेण्याची क्षमता ठेवत असल्याने सहभागी व नागरिकांमध्ये याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. गतवर्षी या सायक्लोथॉनची -जगातील सर्वात लांब सायकल रांग’ म्हणून ‘गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये नोंद झाली आहे. आता पुन्हा एकदा यंदाची सायक्लोथॉन नवा विश्वविक्रम प्रस्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

**दोन प्रवेशद्वारांद्वारे काटेकोर वाहतूक नियोजन...**

सायक्लोथॉनसाठी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या गर्दीचा विचार करून आयोजकांनी उत्तर व दक्षिण दिशांना स्वतंत्र प्रवेशद्वारे उपलब्ध करून देत वाहतूक व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले आहे, अशी माहिती सायक्लोथॉनचे मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी केले आहे. या उपक्रमाचे संयुक्त आयोजन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या विविध शाळा-महाविद्यालय आणि विविध संस्था-संघटना करीत आहेत.

**1. उत्तरेचा प्रवेशद्वार- गेट क्र.1** वॉक-इन, टू-व्हीलर व फोर-व्हीलर वाहनांचा प्रवेश या ठिकाणी असून, प्रवेश वेळ सकाळी 6.30 पर्यंत ठेवण्यात आली आहे. बोऱ्हाडेवाडी, मोशी, चिखली आदी परिसरातील नागरिकांनी या गेटचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गेट व पार्किंगसाठी लोकेशन :

**– एन्ट्री गेट 1 :** HTTPS://MAPS.APP.GOO.GL/OPSVM1HDIAKKDCICA

– पार्किंग : HTTPS://MAPS.APP.GOO.GL/AKXJITKSXSP5NLNW8

**2. दक्षिणेचा प्रवेशद्वार-** गेट क्र. 2 सर्व प्रकारची वाहनं या गेटमधून प्रवेश करू शकतात. प्रवेशासाठी अंतिम वेळ सकाळी 6 वाजेपर्यंत निश्चित आहे. इंद्रायणी नगर, भोसरी, निगडी परिसरातील नागरिकांनी या मार्गाचा वापर करावा.

लोकेशन :

**– एन्ट्री गेट 2 :** HTTPS://MAPS.APP.GOO.GL/IGG6YBXW9GY2TC788

– पार्किंग : HTTPS://MAPS.APP.GOO.GL/GXTJHVNAVCCRVSPM7

> “ रिव्हर सायक्लोथॉनसाठी होणारी मोठ्या प्रमाणावरील गर्दीची शक्यता लक्षात घेता दोन स्वतंत्र प्रवेशद्वारे आणि मोठ्या पार्किंग व्यवस्था तयार केली आहे. सहभागी होणाऱ्या पर्यावरप्रेमी, सायकलपटू आणि सर्व नागरिकांनी वाहतुकीचे नियम, दिशादर्शक, स्वयंसेवकांच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. ज्यामुळे सायक्लोथॉन यशस्वी होईल. सुरक्षिततेसाठी गेट बंद होण्याची वेळ पाळणे, निर्धारित मार्गानेच प्रवेश करणे आणि कार्यक्रमादरम्यान संयम राखणे आवश्यक आहे. कार्यक्रम स्थळी चहा-नाष्टा सुविधा देखील उपलब्ध असून सहभागींसाठी सकाळीपासूनच आवश्यक व्यवस्था केली आहे. मोठ्या संख्येने पुणे-पिंपरी-चिंचवडकरांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन करतो.
>
> **-डॉ. निलेश लोंढे, मुख्य समन्वयक.**


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune